लोकशाही
epaper.lokshahilive.com
26 Aug 2024 - Page 1

# महिलांवर अत्याचार अक्षम्य अपराध, कुणीही सुटता कामा नये !

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा जळगावातून इशारा : 'लखपती दीदी' संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद




लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

महिलांवरील होणाऱ्या अत्याचाराकडे देशातील सर्वच राज्यांनी गांभिर्याने पाहणे गरजेचे असून महिलांवरील अत्याचार अक्षम्य अपराध असून तो अपराध करणारा व त्याला पाठीशी घालणारा कोणीही सुटता कामा नये असा गर्भीत इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जळगाव येथील कार्यक्रमातून दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज जळगाव येथे लखपती दीदी कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले आहे. ते म्हणाले

### महायुती सरकार म्हणजे उद्योग– नोकरीची गॅरंटी

श्री.नरेंद्र मोदी पुढे म्हणाले की, महाराष्ट्र विकसित भारताचा चमकता तारा आहे. गुंतवणूकीसाठी आणि नोकरीसाठी चांगला आहे. महायुतीचे सरकार म्हणजे उद्योग आणि नोकरीची गॅरंटी आहे. अनेक वर्ष स्थिर सरकारसाठी महायुतीच्या सरकारची गरज आहे. इथल्या महिला माझी साथ देतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

की, आज तिन्ही सैन्य दलात महिला अधिकारी आहेत. फायटर, पायलट महिला बनत आहेत. नारिशक्ती नवा कायदा बनवला. राजकारणात महिलांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न केले. सुरक्षेसाठी महत्व दिले; नारीशक्ती देशाची शान असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी यावेळी काढले. नरेंद्र मोदींची मराठीतून भाषणाला सुरुवात होताच महिलांनी जोरदार टाळ्या वाजविल्या. महाराष्ट्रातील माझ्या बंधू भगिनींना जय श्री कृष्णा, उद्या श्रीकृष्ण जयंती आहे तुम्हाला आजच शुभेच्छा देतो, असे म्हणत नरेंद्र मोदींनी मराठीतून भाषणाला प्रारंभ केला.

प्रारंभी पंतप्रधानांच्या हस्ते लखपती दीदीवरील लघुपटाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी प्रातिनिधीक स्वरूपात काही महिलांना प्रमाणपत्राचे वितरण देखील करण्यात आले. यावेळी व्यापीठावर राज्यपाल डॉ. सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहाण, केंद्रीय ग्रामीण विकास राज्यमंत्री डॉ. चंद्रशेखर पेम्मासानी, राज्यमंत्री रक्षा खडसे, कमलेश पासवान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, मंत्री गिरीश महाजन, गुलाबराव पाटील, अनिल पाटील, खासदार स्मिता वाघ, आमदार संजय सावकारे, किशोर पाटील, लता सोनवणे, सुरेश भोळे उपस्थित होते.



### महाराष्ट्र संस्कृतीचा डंका जगभर

महाराष्ट्रातील संस्कृतीचा डंका जगभरात वाजला आहे. मी युरोपमधून पोलंडला गेलो, त्या ठिकाणी मला महाराष्ट्राचे दर्शन झाले. महाराष्ट्राची संस्कृती तेथेही दिसली. पोलंडचे लोक महाराष्ट्रातील लोकांचा खूपच सन्मान करतात. पोलंडच्या राजधानीत त्यांनी कोल्हापूर मेमोरियल उभारले आहे. पोलंडच्या लोकांनी हे मेमोरियल कोल्हापूरच्या लोकांची सेवा आणि सत्कारच्या भावनेला सन्मान देण्यासाठी बनवले आहे. महाराष्ट्रातील गौरवशाली संस्कृती आणि संस्काराचे दर्शन मला सर्वत्र होते, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी म्हणाले की, महिलांवरील होणारे अत्याचार अक्षम्य पाप आहे. दोषी कोणीही असेल त्याला सोडू नका. त्याला कुठल्याही प्रकारे मदत करणारे वाचता कामा नये. पोलीस आणि कुठल्याही स्तरावर कारवाई झाली पाहिजे. सरकार येतील अन् जातील, पण नारी शक्तीकडे लक्ष दिले पाहिजे. महिलांच्या रक्षणासाठी कायदे कठोर केले जात आहे. एफआयआर होत नाही, वेळ लागतो अशा अडचणी येत होत्या. मात्र आता अनेक अडचणी आम्ही न्याय संहितामधून दूर केल्या आहेत. ई-एफआयआर सुरू केल्या आहे. याने गडबड होणार नाही, आता जलद प्रतिसाद मिळेल. फाशी आणि जन्मठेपेची शिक्षा दिली जात आहे. लग्नाच्या नावे फसवणूक होत होती, त्याबाबत कायदा केला आहे. महिलांच्या समस्यांसाठी केंद्र सरकार हे राज्य सरकारच्या सोबत आहे, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

### महिलांशिवाय इतिहास पूर्ण नाही

महाराष्ट्रातील इतिहास महिलांच्याशिवाय पूर्ण नाही, शिवाजी महाराजांना घडविण्याचे काम माता जिजाऊने केले. शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले पुढे आल्या. भारताच्या मातृ शक्तीने समाज घडविण्यासाठी मोठे योगदान दिले. महाराष्ट्रातील महिला चांगले काम करत आहेत, तुम्हा महिलांमध्ये जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांची छाप पाहत आहे. महिला कुठल्याही क्षेत्रात मागे राहता कामा नये, आमची लाडकी बहीण मोठ्या संख्येने उपस्थित आहे, सहा हजार पेक्षा अधिक कोटींचा निधी दिला आहे. महाराष्ट्रातील महिलांना सुद्धा कोट्यवधी रुपयांचा निधी मिळाला आहे.

लोकशाही
epaper.lokshahilive.com
26 Aug 2024 - Page 4

# जळगाव जिल्हा सुजलाम् सुफलाम् करणार !

## खान्देशातील माणसं सोन्यासारखी लाखमोलाची : मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

*जळगाव जिल्ह्यातील सोने, कापूस, डाळी जश्या प्रसिद्ध आहेत, तशी येथील माणसं देखील लाखमोलाची असून सोने जसे बाव्वनकशी आहे तसे तुम्हीही आहेत. पाऊस असतांनाही मोदीभावावर तुमचे प्रेम कायम असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. राष्ट्रीय स्तरावरील लखपती दीदी संमेलनाला महिलांची लक्षणिय उपस्थित होती. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा सुजलाम् सुफलाम् करण्यावर भर देण्यासाठी सिंचनाच्या संपूर्ण योजना पूर्ण करण्यात येतील अशी ग्वाही दिली. यावेळी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनीही मनोगत व्यक्त केले.*



### मुख्यमंत्री शिंदेंकडून नारीशक्तीचे तोंडभरून कौतुक



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समस्त महिला वर्गाला संबोधित करतांना त्यांना प्रोत्साहनही दिले. आपल्या कार्यक्रमाचे सर्व विक्रम आपणच या कार्यक्रमातून मोडीत काढले आहेत. सर्वत्र महिलाच महिला आहेत. तुमच्या सर्वांचे मी स्वागत करतो. तुमच्यासाठी हा आनंद सोहळा आहे. जळगाव ही सोन्याची भूमी आहे. इथले सोने बावनकशी आहे. माझ्या लाडक्या बहिणीही सोन्यापेक्षा सरस आहे. ११ लाख महिला लखपती होणार आहे. मुख्यमंत्री लाडकी योजनेचाही त्यांना लाभ मिळणार आहे. या योजनेमुळे बहिणींच्या चेहऱ्यावरचा आनंद फुलला आहे. तीन मोफत सिलिंडर देण्याची योजना सुरु केली. मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याची योजनाही हाती घेतली आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासाला आम्ही प्राधान्य देत आहोत. महिला सक्षम करण्याचे केवळ स्वप्न पाहिले नाही तर मोदींनी हे स्वप्नपूर्ण केले. तब्बल दहा कोटी महिलांना त्यांनी आत्मनिर्भर केले असून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात देखील आणले आहे. यावेळी त्यांनी कापूस, सोयाबिन पिकांच्या संदर्भात मोदींचे लक्ष वेधत मदत करण्याची मागणी केली.



### कारभार महिलांच्या हाती येणार : फडणवीस

जळगावच्या महिलांनी संख्येचे सगळे रेकॉर्ड तोडले आहेत. संधी दिली तर महिलांनी काम केले. देशाला विकसित करायचे असेल तर महिलांची साथ महत्वाची. २०२९ ला देशाचा कारभार महिलांना देण्याचे ठरविले आहे. वेगवेगळ्या योजना आणून भारत विकसित करायचा आणि त्यात महिलांचा सहभाग महत्वाचा. ७५ लाख कुटुंब बचत गटाशी जोडलर आहे ते २ कोटींवर जाणार आहे. महिला कधीही पैसे बुडवत नाही, त्यामुळे त्यांना पैसे द्यायला बँका तयार आहेत. जिल्ह्याला वरदान ठरणाऱ्या नार-पार योजनेला मान्यता देण्यात आली असून अन्य सिंचन प्रकल्प त्वरीत पूर्ण करुन जळगाव जिल्हा सुजलाम् सुफलाम् करणार असल्याचे यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



### लोककलेचे सादरीकरण अन् मोदींचा दीदींशी संवाद

प्रारंभी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विमानतळावर केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील, मंत्री अनिल पाटील, खासदार स्मिता वाघ, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस महासंचालक दत्तात्रय कराळे, अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी स्वागत केले. यावेळी पंतप्रधान मोदींसमोर खान्देशी कलानृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. मोदी थेट कलावंतांशेजारी जावून उभे राहिले. त्यानंतर त्यांनी लखपती दीदी व महिला बचत गटांच्या सदस्यांशी चर्चा करून त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी अनेक महिलांनी आपले अनुभव मोदींसमोर सादर केले. खान्देशी कलानृत्य पाहून श्री. मोदी स्मितहास्य करीत कलावंतांचा उत्साह वाढवित होते.





### पन्नास लाख महिलांना लखपती करणार : पवार

मोदींचा संकल्प पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्रात ५० लाख महिलांना लखपती दीदी बनवण्याचा संकल्प करू या. महिलांवर जबाबदारी टाकली तर महिला जबाबदारी यशस्वी पेलू शकतात हा महाराष्ट्राचा इतिहास आहे असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. आजच्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पंतप्रधान यांचे स्वागत करताना नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील विकासाचा रथ जळगावात आला आहे. मी आजपर्यंतच्या माझ्या राजकीय जीवनात एवढ्या प्रचंड संख्येने महिलांनी महाराष्ट्रात पंतप्रधानांचे स्वागत केलेले पहिल्यांदाच पाहत आहे अशा शब्दात अजित पवार यांनी पंतप्रधान यांचे स्वागत केले. श्री. पवार पुढे म्हणाले की, असे वातावरण मी पहिल्यांदाच पाहत आहे. आज नैसर्गिक परिस्थिती चांगली नाही, सगळीकडे पाऊस सुरू आहे, तरीही गावातील महिला येथे आलेल्या आहेत. तीन कोटी महिलांना लखपती दिदी बनवायचे मोदींचे उद्दिष्ट आहे. आपण महाराष्ट्रात ५० लाख महिलांना लखपती दिदी बनवण्याचा संकल्प करू या. महिलांवर जबाबदारी टाकली तर महिला जबाबदारी यशस्वी पेलू शकतात हा महाराष्ट्राचा इतिहास आहे. त्याच दिशेने आपण प्रयास करू या असेही पवार यांनी सांगितले. महिला पंतप्रधानांना भेटायला आल्यात, तुमचा उत्साह पाहून तुम्हाला सलाम केला पाहिजे. राज्याने महिलांना मान दिला आहे. सन्मान दिला आहे. सक्षम केले आहे. महिला सक्षम होत असल्याचे ते म्हणाले.

लोकशाही
epaper.lokshahilive.com
26 Aug 2024 - Page 3

लोकशाही

संपादकीय

## लखपती दीदी संमेलनात महिलांच्या सुरक्षेवर पंतप्रधान मोदींचा कटाक्ष



देशातील लखपती महिलांच्या योजनेचा शुभारंभ काल जळगाव येथे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रमुख उपस्थितीत 'लखपती महिला संमेलन' घेऊन पार पडला. देशाच्या कानाकोपऱ्यातून तसेच जळगाव जिल्हा भरातून सुमारे दीड लाख महिलांचा जनसागर या संमेलनास लाभला होता. आतापर्यंतच्या उपस्थितीचे रेकॉर्ड कालच्या महिला उपस्थितीने तोडल्याचे पंतप्रधानांपासून सर्वच राजकीय नेत्यांनी मान्य केले. देशातील इतर राज्यातून महिला लखपती महिला संमेलनास उपस्थित होत्या. प्रातिनिधिक स्वरूपात काही लखपती महिलांना पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. नारीशक्तीच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांचे कौतुक केले. यापुढे देशाचे नेतृत्व हे नारीशक्तीच्या हाती राहील, असाही उल्लेख मोदींनी केला. महिलांच्या कार्याचा गौरव करीत असताना सध्या महिलांवर होत असलेल्या अत्याचाराबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गांभीर्य व्यक्त केले. सध्याच्या महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथील नामांकित शाळेतील दोन बालिकांवर झालेल्या अत्याचार प्रकरणी महाराष्ट्रभर होत असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तसेच देशात वाढत असलेल्या महिलांवरील अत्याचाराच्या घटनांबाबत सर्वच राज्यांना गांभीर्याने घेण्याची सूचना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल्या. महिलांवर होत असलेल्या अत्याचारातील अपराधी तसेच त्याला पाठीशी घालणारे त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. त्यासाठी त्यातून कोणीही सुटता कामा नये. महिलांवर अत्याचार करणे हा फार मोठा अपराध असून तो अक्षम्य असा गुन्हा आहे. त्यासाठी महिलांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करताच त्याबाबत तातडीने एफआयआर दाखल झाली पाहिजे. त्यासाठी पीडित महिलांना एफआयआर दाखल करण्यासाठी पोलीस स्टेशनला गेलेच पाहिजे असे नाही. त्या घरी बसूनही 'ई एफआयआर' सुद्धा दाखल करू शकतात. ई एफआयआरची तातडीने दाखल करून पोलिसांतर्फे त्याची तातडीने चौकशी केली गेली पाहिजे. तशा सूचना सर्वच राज्यांना केंद्रातर्फे देण्यात येतील. दोषी सिद्ध झालेल्या अपराध्यास फाशीची शिक्षा किंवा जन्मठेपेची शिक्षा फास्टट्रॅक न्यायालयामार्फत सुद्धा सुनावण्यात आली पाहिजे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले. आपल्या अर्धा तासापेक्षा जास्तच्या भाषणातील निम्म्यापेक्षा जास्त वेळ त्यांनी महिलांच्या सुरक्षेच्या संदर्भात खर्ची घातला.

येत्या तीन महिन्यात महाराष्ट्र विधानसभा निवडणुका आहेत. लखपती दिदी संमेलनाच्या निमित्ताने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचे जणू रणशिंग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फुंकले आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याने महिलांसाठी विविध योजना राबविल्या असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे कौतुक केले. महायुतीचे प्रामुख्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या महिलांसाठी राबवित असलेल्या योजनांचे कौतुक केले. सध्या महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना राबवित असताना बदलापूर घटनेने जे आंदोलन होते आहे, त्याचा फायदा विरोधकांना मिळू नये, म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांवरील अत्याचाराची गांभीर्याने दखल घेण्यासंदर्भात महाराष्ट्रासह इतर राज्यांना सूचना दिल्या. ते निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे आहे. कारण महिला सुरक्षेच्या संदर्भात गेल्या दहा वर्षात पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मोठ्या गांभीर्याने दखल घेऊन कडक कायद्यातुन अंमलबजावणी करण्याचे संकेत दिले आहेत. यापूर्वी ऑलिम्पिक स्तरावर पदक पटकविणाऱ्या महिला कुस्तीपटूंनी त्यांचे विनयभंग झाल्याबद्दल एका केंद्रीय मंत्र्याच्या विरोधात उपोषण आंदोलन केले, तेव्हा त्या महिला कुस्तीपटूंची केंद्राने दखल घेतली नव्हती. 'विनयभंग करणाऱ्या मंत्र्यांनी माफी मागावी', अशी त्या महिला कुस्तीपटूंची मागणी सुद्धा फेटाळून लावली होती. तेव्हा विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिलांवरील अत्याचाराबाबत निषेधाचे आंदोलन महाराष्ट्रात सुरू झाल्याने किमान महिलांवरील अत्याचाराबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कडक कारवाई करण्याचे आदेश दिले, ही चांगली गोष्ट म्हणता येईल. इतकेच नव्हे तर महिलांवर अत्याचार करणाऱ्या अपराधी तसेच त्या अपराध्यास पाठीशी घालणारे कोणीही असतील तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे मोदींनी आदेश दिले. बदलापूर येथील नामांकित शाळेत झालेल्या बालिकांवरील अत्याचारात ही शिक्षण संस्था भाजपशी निगडित असल्याचे बोलले जाते. त्या शाळेवर कारवाई होणार नाही, अशी अनेकांना शंका वाटते. त्या पार्श्वभूमीवर मोदींनी दिलेले कडक कारवाईचे आदेश महत्त्वाचे आहेत. कालच्या लखपती दीदी महिला संमेलनात महिलांच्या उन्नती संदर्भात तसेच त्यांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात केलेल्या ३५ मिनिटांच्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आगामी विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकल्याचे संकेत दिले असले, तरी विरोधी एकाही नेत्याचे नाव त्यांनी घेतले नाही, हे विशेष होय. कारण लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांच्या नेत्यांवर केलेल्या टिके मुळे त्यांचे काय पडसाद उमटले, याची जाणीव त्यांना झालेली दिसते आहे. या निमित्ताने महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला, आणि त्याची दखल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली, हे विशेष होय...!

दैनिक